4. # राष्ट्रवाद

## 1) प्रस्तावना -

राष्ट्रासाठी त्याग व बलिदान करावयास राष्ट्रातील नागरिकांची भावना निर्माण करणारी ही एक प्रभावी विचारसरणी आहे. राष्ट्राबद्दल नागरिकांमध्ये प्रेम, जिव्हाळा, व श्रद्धेची भावना निर्माण करणारी ही एक प्रभावी विचार प्रवाह महत्वपूर्ण भुमिका बजावतात. आपली ही भावना आपण सगळे एक आहोत या विचारातून निर्माण होत असते. समान धर्म, समान भाषा, समान पंथ तसेच समान इतिहास व समान राजकीय आकांक्षा यातुनच राष्ट्रवादाची निर्मिती होत असते.

## 2) राष्ट्रवाद या शब्दाची उत्पती-

राष्ट्रवाद ही एक मानवीय भावना आहे. राष्ट्रवाद हा शब्द राष्ट्र या शब्दापासून बनला आहे. राष्ट्रवादाला इंग्रजीमध्ये Nationalism असे म्हणतात. हा शब्द लॅटिन भाषेतील Natio या शब्दापासून बनलेला आहे. त्याचा अर्थ वंश असा होतो. म्हणुनच एकाच वंशात राहणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र होय. राष्ट्रवाद हा शब्द राष्ट्र आणि वाद या दोन शब्दांपासून मिळून बनलेला आहे. राष्ट्र या शब्दाचा अर्थ जात, धर्म, संस्कृती, भाषा परंपरा आणि भौगोलिक एकता यांच्याशी संबंधित आहे या विचाराने प्रभावी होऊन आपण सगळे एक आहोत ही भावनिकता किंवा मानसिकता निर्माण होणे म्हणजे राष्ट्रवाद होय.

## 3) राष्ट्रवादाच्या व्याख्या -

राष्ट्रवाद ही व्यापक संकल्पना आहे त्यामुळे त्याची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे. राष्ट्रवाद ही संकल्पना

Scanned with CamScanner

राष्ट्रासाठी सर्वस्व त्याग करावयास लावणारी आहे. भाषिक वांशिक, आणि सांस्कृतिकदृष्ट्या सर्वजण एक असल्याची जाणिव या संकल्पनेतून निर्माण होत असते. बर्जेसच्या मते, "वांशिक एकात्मकता असलेल्या व एकाच भुप्रदेशा-त राहणाऱ्या लोकांचा समुह म्हणजे राष्ट्र होय." भाव-निकदृष्ट्या सर्व लोकांमध्ये एकसंघतेची जाणिव जेव्हा निर्माण होते. तेव्हा ते राष्ट्र राष्ट्रवादी बनते. राष्ट्र म्हणजे राहणारे रहिवासी या रहिवाश्यांमध्ये एकात्मतेची जाणी-व होणे म्हणजे राष्ट्रवादाकडे टाकलेले पहिले पाऊल होय.

4) राष्ट्रवादाच्या व्याख्या अनेक विचारवंतानी केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) जॉन. एच. रनडॉन-

राष्ट्रवाद ही एक अशा प्रकारची भावना आहे की, त्यासाठी अनेक लोक मरण्यासाठी तयार होतात.

2) केलिम्स भ्रास-

राष्ट्रवादाचा संबंध राजकीय सत्ताप्राप्ती किंवा वि-कासासाठी असून ती एकप्रकारे सामुहीक भावना आहे. तिचा आधार विविध प्रकारची एकता व समानता आहे.

3) प्रा. लास्की -

समान वंश, भाषा, इतिहास, परंपरा, राजकीय अपेक्षा यापै-की काहींच्या प्रभावामुळे निर्माण होणारी एकतेची भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.

व्याख्येवरुन निष्कर्ष-

i) राष्ट्रवाद ही एक भावना आहे.

ii) राष्ट्रवादामुळे राष्ट्र स्वतःची संस्कृती देश, भाषा इ. बाबत आत्मीयता निर्माण होते.

iii) राष्ट्रवादात व्यक्तीला त्याग करण्याची भावना मिळते.

iv) राष्ट्राचा प्रमुख हेतु राष्ट्रामध्ये एकात्मता निर्माण करण्या-चा असतो.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

5) राष्ट्रवादाचे निर्धारक घटक-

1] भौगोलिक एकता-

भौगोलिक घटक हा राष्ट्रवादाच्या निर्मितीचा आधारभूत घटक आहे. व्यक्ती ज्या भुमीवर जन्मतो किंवा जन्मल्यानंतर बराच काळ एकाच भुप्रदेशावर राहत असल्यामुळे त्या भुमीबद्दल त्यांच्या मनात आत्मीयतेची भावना निर्माण होते. तो व्यक्ती त्या भुमिला मातृभुमि किंवा पितृभुमी समजतो. त्या मातृभुमीचे संरक्षण करण्यासाठी वाटेल तो त्याग करण्यासाठी तयार होतो. येथील व्यक्तीत एकात्मतेची, परस्पर सहकार्याची, राष्ट्रप्रेमाची, राष्ट्रनिष्ठेची भावना असते. सलग भूप्रदेश असल्यास राष्ट्रप्रेमाची भावना प्रखर असते. तोच विखुरलेला असेल तर लोकांत स्वतंत्र्य अस्तित्वाची भावना निर्माण होते. राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला तडा जातो तसेच आपुलकी व आत्मीयतेच्या भावनेमध्ये दरी पडते. अशाप्रकारे भौगोलिक एकात्मतेमधून राष्ट्रवाद जोपासला जातो.

2] धार्मिक एकता-

धर्ममुळे समाज संघटित होतो. समाजामध्ये एकात्मता निर्माण होते. समान धर्मातील व्यक्तीच्या रूढी, प्रथा, पुजा, उपासना, ईश्वरी कल्पना समान असल्यामुळे त्याच्यात एकात्मता निर्माण होते. समान धर्माच्या लोकामध्ये एकात्मता निर्माण होण्यास वेळ लागत नाही. ऐतिहासिक कालखंडामध्ये धार्मिक भावनेची व्याप्ती जास्त होती. समाजामध्ये धार्मिक एकता नसेल तर राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. 1947 मध्ये धार्मिक मतभेदामुळे भारतातील मुस्लिमांनी भारतापासून वेगळे होवून पाकिस्तानची निर्मिती केली. भारतामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली आहे कारण भारतात विविधतेत एकता आढळून येते. आधुनि

-क काळात सर्वधर्मसमभाव सारख्या तत्वाचा स्विकार केल्या -मुळे सार्वजनिक जीवनामध्ये धर्माचा आग्रह न धरण्याचा गुण निर्माण झाल्याचे दिसून येते. एका समान धर्मातील लोकांमध्ये धार्मिक अभिमानामुळे, त्या धर्मातील पंथा -मध्ये संघर्ष होवून धार्मिक व राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाऊ शकतो. त्यामुळे आज जगातील बहुतांश राष्ट्रे सर्वधर्मसमभाव आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या मानव धर्माचा स्विकार करत असल्याचे दिसून येत आहे.

3] वांशिक एकता -

वांशिक एकात्मतेतून प्रखर राष्ट्रवादाची भाव -ना निर्माण होते. प्राचीन काळापासून एकाच वंशात जन्मलेल्या लोकसमूहाला राष्ट्र असे म्हणतात. एकाच वंशा -च्या लोकांमध्ये रक्तसंबंधाचे नाते असते. एकमेकाबद्दल आपुलकीची, आपलेपणाची तसेच आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण होते. आपले पूर्वज एक होते ही भावना जनतेत एकात्मता निर्माण करते. लिकॉकच्या मते, वंश ही राष्ट्रवाद निर्माण करणारी बाब आहे. वांशिक एकतेच्या आधारे जर्मनीम -ध्ये हिटलरने प्रखर राष्ट्रवाद निर्माण केला होता. राष्ट्रवादाच्या निर्मितीत वांशिक एकता हा घटक महत्वाचा असला तरी वांशिक एकतेशिवाय अमेरिका, भारत, कॅनडा, रशिया येथे राष्ट्राची निर्मिती झालेली दिसून येते. रेनानच्या मते, आजच्या समाजात वांशिक एकता सापडणे अवघड आहे.

4] सांस्कृतिक एकता -

संस्कृतीमध्ये भाषा, लिपी, रुढी, परंपरा, चालिरीती शिक्षण, कला, साहित्य, सण, उत्सव इ. अनेक घटकांचा समावेश होतो. या सांस्कृतिक घटकामध्ये समानता असल्या -स समाजातील नागरिकांमध्ये ही संगठन होते. व

त्यातुनच राष्ट्रवादाची निर्मिती होते व्हो. टिळकांनी राष्ट्रवादा-च्या निर्मितीसाठी सांस्कृतिक एकतेवर भर दिलेला दिसून येतो. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, नेत्यांच्या जयंत्या, राष्ट्रीय खेळांच्या आयोजनातून ही एकात्मता निर्माण होते. राष्ट्रवादाच्या निर्मिती-साठी सांस्कृतिक एकता हा घटक महत्वाचा असला तरी तो एकमेव नाही कारण सगळीकडे विविध प्रकारची संस्कृती दिसून येते. संस्कृतीमध्ये अस्थिरता, गतिशीलता निर्माण होत आहे.

5] ऐतिहासिक एकता-

इतिहासामध्ये घडलेल्या घटना झालेले युद्ध, चळवळी, मिळवलेला विजय, परकीय आक्रमणे, प्राचीन संस्कृती, थोर नेते, संतांची चरित्रे, राष्ट्रासाठी केलेले बलिदान, रूढी-परंपरा, इत्यादी-च्या आधारावर लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण होऊन राष्ट्राची निर्मिती होते. इतिहासातील घटनेमुळे लोकांत एकात्म-तेची, राष्ट्रीयत्वाची, राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते. अनेक विचारवंत या घटकाच्या आधार राष्ट्रनिर्मितीसाठी मानतात. राष्ट्रीयत्वाच्या भावनेत वाढ होण्यासाठी इतिहास किती महत्वाचा आहे. यासंदर्भात मांडणी करताना जे. एस. मील असे म्हणतात की, "राष्ट्राचा गौरवपूर्ण इतिहास आणि त्यासंबंधीच्या स्मृती तसेच इतिहासातील घडामोडीबद्दल वाटणारा अभिमान किंवा अपमान, सुख आणि दुःखाची सामुदायिक भावना राष्ट्रवा-दाच्या निर्मितीमध्ये महत्वाची भुमिका बजावत असतात.

] समान हितसंबंध -

लोकांमध्ये आर्थिक, सामाजीक, राजकीय हितसंबंध समान असल्यास एकात्मता व एकात्मतेतून राष्ट्रवादाची निर्मिती हो-ते. जात, धर्म, वंश, लिंग यात विविधता आणि तरी केवळ आर्थिक हितसंबंधामधून एकात्मतेची भावना निर्माण होते. यासंदर्भात असे म्हटले जाते की पैसा हा व्यक्तीला जोडतो किंवा तोडतो. फ्रान्स, जर्मनी, इटली येथे आर्थिक हितसंबंधामुळे

किंवा व्यावसायिक समानतेमुळे तेथील लोकांमध्ये वांशिक, भाषिक, विविधता असूनही समान हितसंबंधामुळे त्यांच्यात एकात्मतेची भावना आहे.

7] समान राष्ट्रीय आकांक्षा-

इतर घटकाप्रमाणेच समान राष्ट्रीय आकांक्षा हा ही एक महत्वाचा घटक आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक भाषिक, वांशिक भिन्नता समाजामध्ये असलीतरी रा-ष्ट्रीय एकात्मतेमुळे त्या समाजामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण होते. तसेच साम्राज्यवाद व वसाहतवादाच्या विरोधात अन्याय, अत्याचार, पिळवणुकीपासून मुक्त होण्यासाठी जे प्रयत्न केले जातात. यामुळे समाजात राजकीय अस्मिता किंवा राष्ट्रीय आकांक्षा निर्माण होते. यावेळी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. 1947 पूर्वी भारतामध्ये विविध प्रकारचा भेदभाव असूनसुध्दा केवळ भारताला स्वातंत्र्य मि-ळावे याच उद्देशाने भारतीय समाजात राष्ट्रीय आकांक्षा निर्माण झाली. भारताप्रमाणेच इटलीमध्येही समान राष्ट्रीय आकांक्षेतून राष्ट्रवादास गती मिळाली. लॉर्ड ब्राईसच्या मते, राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी राजकीय संघटनेद्वारा एकत्र येणारा समाज आणि त्या समाजाची समान राष्ट्रीय आकांक्षा या भावनेतून व ध्येयातून राष्ट्रवादाची निर्मिती होते.

8] राष्ट्रीय शिक्षण-

राष्ट्रवाद निर्मितीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाची भुमिका महत्वाची असते. शिक्षणामुळे लोकांमध्ये सामाजिक, आर्थिक जागृती निर्माण होते. समतेप्रमाणे स्वातंत्र्य व न्यायाचेही आकलन नागरिकांना होते. लो. टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार बरोबर राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला होता. राष्ट्रीय शिक्षणामुळे राष्ट्रासाठी आत्मसमर्पन, त्याग करण्याची भावना व्यक्तीमध्ये निर्माण होते. राष्ट्राबद्दल आदर

बाळगला पाहिजे इत्यादी ज्ञान तसेच राष्ट्रप्रेम निर्माण होणारे धडेही शिक्षणातून दिले जातात.

13) एकत्र राहण्याची ईच्छा -

आधुनिक काळात राष्ट्रनिर्मितीचा घटक म्हणजे लोकांमध्ये एकत्र राहण्याची ईच्छा निर्माण झाली पाहिजे. जात, धर्म, वंश इत्यादींच्या बाबतीत भिन्नता असूनदेखील लोकांमध्ये हा देश माझा आहे. या देशामध्ये राहणारे लोक एक आहेत. अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे. भारतात विविध जाती-धर्माचे लोक राहत असले तरी त्यांच्यात एकत्र राहण्याची ईच्छा असल्यामुळे राष्ट्रवादाची निर्मिती झाली पाहिजे "राष्ट्रवादाचा प्रमुख घटक ईच्छा आहे असे हाईनवी हा विचारवंत म्हणतो. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी वरील सर्व घटकांची आवश्यकता असते.

राष्ट्रवादाची निर्मिती करण्यासाठी भौगोलिक सांस्कृतिक, वांशिक, भाषिक इ. सर्वच घटक सर्वच ठिकाणी अस्तित्वास असले पाहिजेत. यातील काही घटकामुळेही राष्ट्रवादाची निर्मिती होते. गिल ख्रिस्टच्या मते, राष्ट्रवादाची ही तत्वे अनिवार्य नाहीत. कारण राष्ट्रवाद ही भावना परस्परातील एकात्मतेच्या भावनेतून निर्माण होते.

* राष्ट्रवादाचे प्रकार -

राष्ट्रवादाच्या प्रकाराबाबत विविध लेखकांनी आपापल्या दृष्टिकोनातून प्रकार सांगितले आहेत. ते प्रकार खालील प्रमाणे आहेत.

1) उदारमतवादी राष्ट्रवाद -

उदारमतवादी राष्ट्रवादामध्ये व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीचे महत्व, कल्याण, लोकमताचा विचार, लोकभावनेची कदर,

Scanned with CamScanner

मत स्वातंत्र्य, घटनेला महत्वाचे स्थान असते. तरलोकशा-हीमध्ये समता, स्वातंत्र्य, न्याय, व्यक्तीविकास निवडणूक लोकमत याला महत्व असते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, भारत यासारख्या राष्ट्रामध्ये उदारमतवादी राष्ट्रवाद दिसून येतो. लोकशाहीमध्ये व्यक्तीस्वातंत्र्याला महत्वाचे स्थान असल्यास त्यामध्ये उदारमतवादाचा विकास हो-तो. कारण उदारमतवाद हा व्यक्तीस्वातंत्र्यावर आधा-रित आहे.

२) आक्रमक राष्ट्रवाद -

आक्रमक राष्ट्रवाद हा उदारमतवादावरील लोक-शाही मुल्यांचा -हास होवून निर्माण होतो तो सर्वंकश-वादाचा स्विकार करणारा असतो. या राष्ट्रवादाने वंश श्रेष्ठत्व, लष्करवाद, एकाधिकारशाही, सैन्य उभारणी, साम्राज्यवाद इ. नवीन तत्वाचा स्विकार केला असून लोकशाही, उदारमतवाद व शांतता यास विरोध करतो. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धा-नंतर ज्या ज्या राष्ट्रात सर्वंकश सत्ता उदयास आली त्यात्या राष्ट्रांत उदा. रशिया, जपान, चीन, हंगेरी, इटालीत आक्रमक राष्ट्रवाद दिसून येतो. त्याचप्रमाणे इटालीत मुसोलिनीने व जर्मनीत हिटलरने आक्रमक राष्ट्रवाद रुजविला.

3) प्रागतिक राष्ट्रवाद -

प्रागतिक राष्ट्रवाद हा लोकशाही विचाराचा असतो, त्यालाच शुद्ध राष्ट्रवाद असेही म्हणतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मुल्यावर विश्वास ठेवून कल्याण-कारी राज्याची स्थापना करावयास लावणारा हा राष्ट्र-वाद असतो. विषमता, स्वार्थ, संकुचितपणा व भेदभाव यांना विरोध करुन परस्पर सहकार्य व सामंजस्य या तत्वांचा स्वीकार राष्ट्रवाद करतो.

Scanned with CamScanner

4] प्रतिगामी राष्ट्रवाद-

प्रतिगामी राष्ट्रवादास आक्रमक किंवा अतेरिकी राष्ट्रवाद असेही म्हणतात. या राष्ट्रवादाच्या पुरस्कार सर्वप्रथम मॅकेव्ह -लीने केला. हेगेलच्या लिखानातून अशा प्रकारचा राष्ट्रवाद प्रभावीपणे मांडलेला दिसतो. इटालीमध्ये मुसोलिनी आणि जर्मनीमध्ये हिटलर यांनी याच मार्गाचा अवलंब केला मुसो -लिनी या संदर्भात असे म्हणतात की, "इटालीपुढे फक्त दोनच पर्याय आहेत, इटलीने साम्राज्य विस्तार केला पाहिजे अन्यथा नष्ट झाले पाहिजे.

5] सांस्कृतिक राष्ट्रवाद

सांस्कृतिक राष्ट्रवादालाच आध्यात्मिक राष्ट्रवाद असे म्हणतात या राष्ट्रवादामध्ये भाषा, लिपी, परंपरा चालिरीती, शिक्षण, कला साहित्य, उत्सव, सण. इत्यादी घटकांचा समावेश होतो इतिहा -सातून प्रेरणा घेवून समाजामध्ये क्रांतिकारी विचार रुजविले जातात. या प्रकारच्या राष्ट्रवाद सांस्कृतिक मुल्यांच्या सोबत घेवून राष्ट्रीय विचाराची जोपासना करीत असतो. समान सांस्कृतिक मूल्य असलेल्या समाजामध्ये राष्ट्रवाद निर्माण होण्यास अनुकूल परिस्थिती तयार होते. राष्ट्र ही आपली जन्मभुमी मानत असणाऱ्यांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते, मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करावयास आपण नेहमी तयार असले पाहिजे. राष्ट्रवाद म्हणजे एक धर्म आहे, तो अमर आहे. आपल्या धर्माचे जसे आपण पालन करतो तसेच राष्ट्रवादाचे पालन केले पाहिजे. आवश्यकता पडेल तेव्हा राष्ट्र -वादासाठी जीवही दिला पाहिजे. भारतामध्ये अशा प्रकारचा सांस्कृतिक राष्ट्रवाद स्वामी दयानंद सरस्वती यांच्यापासून योगी अरविंद घोषापर्यंत अनेक विचारवंतांनी मांडलेला आहे. लोकमान्य टिळकांनी तर अशा प्रकारचा राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी शिवजयंती व गणेशोत्सव सारखे वेगवेगळे

कार्यक्रम आयोजित केले. त्यामधूनच भारतीयांमध्ये राष्ट्रवादी विचार जागा करण्याचे प्रयत्न केले. आधुनिक काळामध्ये प्रत्येक देशामध्ये सांस्कृतिक राष्ट्रवादाचा विकास फार मोठ्या प्रमाणात होत असलेला दिसून येतो, तसेच विविध राष्ट्रीय खेळामधूनही राष्ट्रवाद दिसून येतो.

इत्यादी राष्ट्रवादाचे प्रकार आहेत.

राष्ट्रवादाचे गुण-दोष-

राष्ट्रवादाचे गुण-

1] राष्ट्रप्रेमाची भावना-

समाजातील प्रत्येक व्यक्तीत राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्याचे काम राष्ट्र करते. या राष्ट्र-प्रेमाच्या भावनेतून व्यक्तीत एकात्मता तयार होते. देशातील लोकांचे चारित्र्य राष्ट्रवादी बनते. या राष्ट्रवादी चारित्र्यातून राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, देशभक्ती, इतरांबद्दल आपुलकी परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते.

2] एकात्मता निर्माण होते-

एकात्मतेशिवाय राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. एकात्मतेमधूनच राष्ट्राचा उदय होतो. भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक एकात्मतेमधूनच राष्ट्रवादाची निर्मिती होते.

3] राष्ट्राचा विकास होतो-

अनेक लोकांना राष्ट्राबद्दल प्रेम, जिव्हाळा वाटत असेल तर त्यातुनच राष्ट्राचा विकास होतो. राष्ट्राचा विकास करण्यासाठी सर्वांनी सर्वस्व अर्पण करायची तयारी ठेवली पाहिजे. त्यातूनच राष्ट्रवादाचा विकास घडून येतो.

Scanned with CamScanner

4] स्वातंत्र्यता आणि स्वंयपूर्णता-
राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरित झालेली जनता, वाटेल तेवढे कष्ट करण्यास तयार होते. प्रत्येक व्यक्तीने काम केल्यामुळे देशाच्या उत्पादनात वाढ होऊन देश हा संपूर्ण स्वावलंबी बनतो. आंतरराष्ट्रीय संबंधामुळे देश स्वाभिमानाने स्वतंत्र्य भुमिका घेऊ शकतो. राजकीय, सामाजिक, धार्मिक, स्वातंत्र्य व्यक्तीला राष्ट्रवादातूनच मिळते. समाजामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाल्या-मुळे प्रत्येकाच्या मनात राष्ट्रीय स्वातंत्र्याची ईच्छा निर्मा-ण होते.

5] सहकार्याची भावना निर्माण होते-
राष्ट्रवादामुळे प्रत्येकात सहकार्याची भावना निर्माण होते. या सहकार्यातून राष्ट्राचा विकास होतो. सहकार्यबरो-बरच सामंजस्य शांतता इ. मधूनही राष्ट्रवादाचा विकास होतो. नागरिकांना शांतता, अनुशासन, सुव्यवस्था इत्यादी-ची प्रेरणा मिळते.

6] राष्ट्रीय संस्कृतीचे जतन-
राष्ट्रवाद हा आत्तापर्यंतचा इतिहास आहे. तो वरवर गोष्टीने निर्माण झाला नाही. तर परिस्थितीनुसार त्याची निर्मिती झालेली दिसुन येते. इतिहासात पाहून राष्ट्राचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक विचाराचा स्विकार केला जातो. राष्ट्रवादातून संस्कृतीचे जतन होते.

7] समतेची भावना निर्माण होते-
राष्ट्रवादामुळे समतेची भावना निर्माण झाली. राष्ट्र-वादामुळे आपण सर्वजण एक आहोत ही भावना निर्माण होते. आपापले लहान-लहान मतभेद बाजूला ठेवून, अन्याय अत्याचार करणाऱ्या साम्राज्यशाही विरुद्ध सर्वांनी संघटित होऊन लढले पाहिजे ही भावना जनतेमध्ये निर्माण झाली. त्यातूनच स्वतंत्र्य राष्ट्र राज्याचा उदय झाला.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

४) साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध-
शष्ट्रवादामध्ये दुसऱ्या राष्ट्राचे वर्चस्व अमान्य केले जाते. आपले राष्ट्र श्रेष्ठ आहे असे सर्वांनाच वाटते. राष्ट्रवाद, उदारमतवाद, प्रामाणिक राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, वसाहतवादाविरुद्ध तसेच सर्व कष्टवादालाही विरोध करतो.

अशाप्रकारे राष्ट्रवाद हा विचार आधुनिक काळात महत्वपूर्ण आहे. राष्ट्रवाद ही विचार आधुनिक प्रणाली राष्ट्रासाठी त्याग करावयास लावणारी एक व्यापक विचारप्रणाली आहे, असे म्हणता येईल. त्यामधून राष्ट्र अधिक शक्तिशाली बनत असते.

राष्ट्रवादाचे दोष -

1] संकुचित भावनेला चालना-
राष्ट्रवाद म्हणजे आपल्या राष्ट्राबद्दल प्रेम व दुसऱ्या राष्ट्राबद्दल द्वेष असा याचा अर्थ आहे. ही संकुचित भावना आहे. ही भावना आंतरराष्ट्रीय नाही. यामुळे आस्तित्वाच्या धोरणाला अडथळा निर्माण होतो.

2] विश्व राज्याला अडथळा-
जागतिक सरकार किंवा विश्व राज्याच्या निर्मितीतील राष्ट्रवाद हा मुख्य अडथळा आहे. राष्ट्रवादात विशिष्ट राष्ट्राच्या विकासाचाच विचार केला जातो. त्यामुळे जगाचा विचार करण्याची प्रवृत्ती खंडित होत आहे.

3] साम्राज्यवादाला चालना-
आपल्याच साम्राज्याचा विकास झाला पाहिजे. यामुळे साम्राज्यवादाला चालना मिळते. उदा. मुसोलिनीने इटलीमध्ये राष्ट्रवादी विचारातून साम्राज्यवादाचा विस्तार केला. राष्ट्रवादात हा एक दोष आहे.

Scanned with CamScanner

Page No.
Date: / /

4] जागतिक शांततेला अडथळा -

राष्ट्रवादामुळे आपल्याच राष्ट्राबद्दल प्रेम निर्माण होते व इतर देशाबद्दल द्वेष निर्माण होतो व जागतिक शांतता नष्ट होते. व युद्धासारखे प्रसंग निर्माण होतात.

5] आंतरराष्ट्रीय संघटनेला अपयश -

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या दोन संघटना निर्माण झाल्या. या संघटनेच्या अपयशाची सर्वात महत्वाची कारणे राष्ट्रवाद आहे.

6] व्यक्तीविकासाला अडथळा -

राष्ट्रासाठी सर्व त्याग केल्यामुळे आपल्यासाठी आपण काहीच करच नसतो. यामुळे व्यक्तीचा विकास खुंटतो. हा एक याचा महत्त्वपूर्ण दोष आहे.

7] लोकशाहीला अडथळा -

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, इ. नैतिक मुल्यांचा राष्ट्रवादामुळे ऱ्हास होत असतो. कारण राष्ट्रवादामध्ये हिंसक कृती, जबरदस्ती इ. समर्थन केलेले असते.

8] व्यक्तीपुजेला महत्व -

राष्ट्रवादामुळे एकाधिकारशाहीची निर्मिती होऊ शकते. लोकशाहीतील मुल्यांऐवजी एखाद्या विशिष्ट व्यक्तीचेच पुजन केले जाते. राष्ट्राची सर्व सत्ता त्याच्याच चरणी अर्पित केली जाते.
उदा. जर्मनी - हिटलर, इटली - मुसोलिनी.

9] द्वेषभावना -

राष्ट्रवादामुळे आपल्या राष्ट्राबद्दल प्रेम निष्ठा, जिव्हाळा, निर्माण होतो. हे जरी खरे असले तरी इतर राष्ट्राबद्दल द्वेषभावनेची निर्मिती होते.

Scanned with CamScanner

हा राष्ट्रवादाचा दोष आहे.

10] युद्धाला चालना मिळते-

राष्ट्रवादी विचारामुळे व्यक्ती आपले सर्वस्व राष्ट्रासाठी अर्पण करत असते. राष्ट्र हे सर्वश्रेष्ठ असते. म्हणून राष्ट्रासाठी वाटेल ते करण्या-स सर्व नागरिक तयार होतात. यातून मत्सराचा उदय होतो. आणि युद्ध घडतात. हा एक राष्ट्रवादा-चा महत्वपूर्ण दोषच मानावा लागेल.

समारोप -

वरीलप्रमाणे, राष्ट्रवाद या विचारप्रणालीमध्ये अनेक दोष दिसून येतात. अनेक दोष दिसून येत असले तरी राष्ट्रवादाचे महत्व आपल्याला टाळता येत नाही.

मुळात राष्ट्रवादी विचार हा वाईट नाही. कारण राष्ट्रवादी विचाराची नैतिक मुल्यावर श्रद्धा असते. जेव्हा जेव्हा राष्ट्राचे अस्तित्व धोक्यात येत असते तेव्हा तेव्हा राष्ट्रवादी विचार त्या राष्ट्राच्या अस्तित्वाला पुन्हा उभे करण्याचे काम करीत असतो.

Scanned with CamScanner